International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.9 No.6 July – Aug 2022

# ग्रॅंट डफ मराठा इतिहासकार

**प्रा. डॉ. अभय पाटील.**
**इतिहास विभाग, स.गा.म. कॉलेज कराड**
*Corresponding Author* - प्रा. डॉ. अभय पाटील.
DOI - 10.5281/zenodo.7885152

मराठयांचा पहिला इतिहासकार म्हणून ग्रॅंट डफ यांना मोठे महत्व आहे. ग्रॅंट डफ बाबत रा. ब. किर्तने यांना प्रथम लिहलें. सातारचे महाराज प्रतापसिंह व ग्रॅंट डफ यांच्या पत्रव्यवहारावरून आपणास कळते की सातारा व येथील राज्यकारभार या बाबत डफ किती चिंता करीत होता. सातारा येथील लोकांविषयी त्यांचे असणारे प्रेम कल्याणकारी राज्यकारभाराविषयी डफची असणारी आस्था, प्रतापसिंह महाराज व सातारचे राज्य, येथील रयत, प्रशासन व कल्याणकारी योजना या दोघांच्या पत्रव्यवहारावरून आपणास कळू शकते. व प्रतापसिंह महाराज व ग्रॅंट डफ यांचे ऋणानुबंध किती घट्ट होते यांची आपणास कल्पना येते. [१](भारत वर्ष अंक १पृ.६७)

स्कॉटलंड मधील बॉन्फ या शहरात दि. ८ जुलै १७८९ रोजी किन्करडिन ओ'निलच्या ग्रॅंट कुटुंबांत जेम्सचा जन्म झाला. हे वर्ष फ्रेंच राज्यक्रांतीचे होते.यामुळे संपूर्ण युरोप ढवळून निघण्यास प्रांरभ झाला. अशा क्रांतीकाळात त्याचा जन्म झाला.त्यांच्या वडीलांचे नावं जॉन होते. आईचे नांव मार्गारिट होते. ती इडनच्या डफ घराण्यातील होती. तिचे आई वडील व भाऊ विल्यम डफ यांच्या अकाली निधनानंतर डफ घराण्याची सारी मिळकत ही मार्गारिटला मिळाली. त्यामुळे जेम्स ग्रॅंटला

आपल्या मातुलगृहाचे उपनांव घ्यावे लागले.व तो जेम्स ग्रॅट डफ या नावांने ओळखला जाऊ लागला.

जेम्स ग्रॅट डफने आपले प्राथमिक पूर्ण केले पण कॉलेजचे शिक्षण हे ॲबरडीन येथील मारीशल कॉलेजमधून पुर्ण केले नाही. कॉलेजच्या शिक्षणास रामराम ठोकून. वयाच्या १६ व्या वर्षी (१८०५) मध्ये त्यांने मायदेशाचा निरोप घेतला. एक वर्षभर प्रवास करून १८०६ मध्ये तो मुबंईच्या किनाऱ्यावर उतरला.त्याचा प्रवास हा अत्यंत कष्टप्रद झाला होता.[२] (कै. न.ची. केळकर स्मारक व्याख्यानमाला,१९६९ अ.रा.कुलकर्णी. पुणे विद्यापीठ प्रकाशन जेम्स कॅनिंगहॅम ग्रॅट डफ पृ. ४)

त्यांने त्वरीत कंपनीच्या लष्करात एक साधा कॅडेट म्हणून प्रवेश केला. सन. १८०७ ते १८१७ या काळात त्यांने एनसाईन, ग्रेनेडिअर्स, लेफ्टंनंट या लष्करातील बढत्या स्वकर्तृवावर संपादन केल्या. या काळात त्यांने फार्सी भाषा आत्मसात केली.लष्करातील दुभाषाक म्हणून काम केले. या काळात माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन हा पुण्याचा ब्रिटिश रेसिंडेट म्हणून सन.१८१०ला पुण्यात दाखल झाला. कंपनीने त्यांच्याकडे दोन महत्वाची कामे दिली होती ती म्हणजे पेशव्यांची सत्ता नष्ट करणे व दुसरे या विभागात कार्यक्षम प्रशासन करणे.या साठी एल्फिस्टनने अगोदरच कार्यक्षम अधिकारी गोळा केले होते. जेम्सच्या मुंबई व गुजरात येथील कामाची माहीती एल्फिन्स्टनच्या कानावर होती. म्हणून त्यांने पॉटिंजर, ब्रिग्ज, चॅपलिन यांच्या बरोबर आपल्या निकटवर्तियामध्ये त्यास घेतले. पुढे गणेशखिंड व खडकीच्या युध्दात ग्रॅट डफने मोठा पराक्रम केला. सन. १८१८ ला मराठासत्ता संपुष्ठात आली.या बरोबरच त्यास कॅप्टन हे पद मिळाले. पेशव्याकडून जिंकलेल्या प्रदेशावर इंग्रजी अंमल बसविणे. तसेच सातारचे राज्य स्वंतत्र ठेवण्याचा निर्णय कंपनीने घेतला

होता. ही सारी कामे पाहण्यास तरूण कर्तबगार व निडर तरूणांची एल्फिन्स्टनला गरज होती.ती गरज जेम्स ग्रॅट डफ यांने पूर्ण केली.तो लष्करी व सनदी क्षेत्रात कुशल होता.म्हणून त्यास साताराचा पोलिटिकल एजंट म्हणून एल्फिन्स्टनने रूजू केले.व मासिक वेतन रू.२००० व भत्ता १५०० असे ३५०० रू. एवढा पगार त्यास दिला.[३] (कित्ता , अ.रा.कुलकर्णी जेम्स् कॅनिंगहॅम ग्रॅन्ट डफ पान.१०,१९६९.) तसेच सातारचे राज्य कसे चालवावे याबद्दल सुचना केल्या. महाराज प्रतापसिंह यांनी एका जाहीरनाम्याव्दारे (दि. ११/०४/१८१८) ग्रॅन्टला सातारा राज्याची धुरा व्यवस्था लावण्याचे सर्वाधिकार दिले होते. सन. १८१८ ते १८२२ ही चार वर्षे साताऱ्याचा पोलिटिकल एजंट म्हणून तो राहिला. या काळात आलेल्या आपत्तींना तोंड देऊन राजा व प्रजा यांना सुस्कृंत बनविले राज्य व मुलुख सुस्थिर केला.[४] (कोलब्रुक भाग २ पान १८७–८) प्रतापसिंह महाराज व त्यांच्यात जो पत्रव्यवहार झाला त्यामधून आपणास कळते.

साताऱ्याचे राज्य हाकीत असताना त्यांने मराठयांच्या इतिहासास आवश्यक असणारी अशी मराठी, इंग्रजी, फार्सी इ. भाषांतील साधन साम्रुगी मिळविली, टाचणे व टिप्पणे तयार केली व मराठयांच्या इतिहासाचा आराखडा तयार केला.दैनंदिन राज्यकारभाराचे कामकाज सांभाळून रात्री जागून त्यांने आपल्या इतिहासाचा मसूदा तयार केला.एक उत्तम प्रशासक म्हणून साताऱ्याच्या जनतेत विशेष स्थान पटकावले होते.साताऱ्यात त्यांने वसूलीची जी व्यवस्था निर्माण केली होती त्यास लोक 'ग्रॅन्ट साहेबाचा सूड' असे संबोधित असत.[५] (पारनिस द.वा. महाबळेश्वर पान. ४१) एक समकालीन ब्रिटिश अधिकारी स्टीफेन साताऱ्यातील ग्रॅटच्या कामगिरीविषयी म्हणतो वयाच्या अवघ्या २५ व्या वर्षी, शासनाचा पूर्वीचा कसलाही अनुभव नसताना एका राज्याचा कारभार

करण्याचे सर्वाधिकार कंपनीने या तरूणला दिले आणि त्यांने चातुर्य आणि कणखरपणा दाखवून राज्यकारभार केला आणि एका जंगलमय प्रदेशाचे नंदनवंन केले.'[६](The life of Sir James Fitzjames Stephen by Leslie Stephen p.171. London 1895)

प्रशासन व इतिहास लेखन व सततचे जागरण यामुळे त्यांच्या प्रकृतीवर परिणाम होऊ लागला. तो आजारी पडू लागला परिणामी त्यास हिंदूस्थान सोडावा लागला. प्रतापसिंह महाराजाच्या हाती सातारचे राज्य हवाली केल्यानंतर तो मुंबईस आला. १८ जानेवारी १८२३ रोजी त्यांने भारताचा किनारा सोडला व २५ मे ला तो इंग्लंडच्या किनाऱ्यावर उतरला. सन.१८२३ ते १८२६ ही तीन वर्षे त्यांने 'मराठयांचा इतिहास' याचा पक्का मसूदा तयार करण्यात घालविली. लंडनमधील प्रकाशक जॉन मरे यांना इतिहासाचे तयार केलेले बाड व नकाशे अवलोकन करण्यासाठी पाठविले. पुढे जेम्स् मॅकिनटॉश यांच्या सहकार्याने लॉगमन्स कंपनीने 'मराठयांचा इतिहास' तीन खंडात प्रकाशित केला. यासाठी एकून १७०० पौंड खर्च आला.[7] (JIH P.235-17-11-1829)

मराठयांचा इतिहास या खंडाचे कामकाज हे ग्रॅट डफचे महत्वपूर्ण कार्य होय.

**संदर्भ साधने :**


१.**भारत वर्ष अंक १पृ.६७**

२.कै.न.ची. केळकर स्मारक व्याख्यानमाला,१९६९ अ.रा. कुलकर्णी. पुणे विद्यापीठ प्रकाशन जेम्स कॅनिंगहॅम ग्रॅट डफ पृ. ४

३. **कित्ता , (अ.रा.कुलकर्णी जेम्स् कॅनिंगहॅम ग्रॅन्ट डफ पान. १०,१९६९.)**

**४.कोलब्रुक भाग २ पान १८७—८**

५.पारनिस द.वा. महाबळेश्वर पान. ४१

6.The life of Sir James Fitzjames Stephen by Leslie Stephen p.171. London 1895.

7.JIH P.235-17-11-1829.